जा. क्र. माध्य-३/(१)/पीडी
शिक्षण उपसंचालक, पुणे-
विभाग-पुणे दि. ४।७।८४

प्रति,

मा. अध्यक्ष,
हरिजन विद्यार्थी सहाय्यक मंडळ
पुणे, १४८४ सदाशिव पेठ, पुणे-३०

विषय :- १९८४-८५ या शैक्षणिक वर्षात (जून १९८४ पासून) नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत.

महोदय,

प्रस्तुत प्रकरणी आपणास कळविण्यात येते की खाली दर्शविल्याप्रमाणे विना अनुदान तत्वावर, विशेष बाब म्हणून जून १९८४ पासून नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

| संस्थेचे नाव | शाळेचे ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|
| हरिजन विद्यार्थी सहाय्यक मंडळ, पुणे | १) कोळवडे ता. खासवड | आठवी | मराठी |
| | २) कोंढवे खुर्द ता. हवेली | आठवी | मराठी |

सदरची परवानगी ही खालील अटींची पूर्तता करण्याच्या अटीवरच देण्यात येत आहे.

अ) नवीन माध्यमिक शाळेला कोणत्याही प्रकारचे अनुदान अनुज्ञेय रहाणार नाही.

(ब) सदर माध्यमिक शाळांनी, शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशांचे (उदा० विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत इ.) काटेकोर पालन करणे आवश्यक आहे.

क) संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

ड) संबंधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० या दोन्ही अधिनियमाखाली नोंदलेली असली पाहिजे.

इ) संस्थेविरुद्ध गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नसल्या पाहिजेत.

ई) सदर संस्थेने चालविलेल्या माध्यमिक शाळांपैकी पुरवाद्या आवेश्यी मान्यता काढून घेतलेली नाही.

उ) माध्यमिक शाळा संहिता नियम क्र. ३ मधील सर्व अटींची पूर्तता केली असली पाहिजे.

ऊ) संस्थेने प्रत्येक वर्गाकरिता शासन अधिकृत बँकेत ५,०००/- रु. ठेव ठेवली पाहिजे.

(सही)

~~शिक्षण उप संचालक~~
पुणे विभाग, पुणे-१

प्रत - शिक्षणाधिकारी जि. प. पुणे यांना माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी.